'3 0 SEP 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवऊर्जा देखाव्याला उदंड प्रतिसाद

## लाखो भाविकांची उपस्थिती : कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : प्रसन्नतेची ऊर्जा देणाऱ्या नवदुर्गांचे एकाच स्थळी दर्शन घडले, प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांच्या दिग्दर्शनाखाली नवऊर्जा भव्य देखावा शहरात प्रथम भक्तांसाठी साकारला. एकाच दिवशी लाखभर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. जवळपास २७ हून अधिक उल्लेखनीय यश मिळवलेल्या महिला, युवतींचा सत्कार करण्यात आला. या निमित्ताने सुंदरता, पवित्रता, प्रसन्नता भक्तीचा आनंद मेळाच नऊ दिवस रसिकांनी अनुभवला. त्याबद्दल पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या संयोजनास धन्यवाद देत असा उत्सव दरवर्षीही होत राहावा, अशी अपेक्षा भक्तांनी व्यक्त केल्या.



**कोल्हापूर : कै. भालचंद्र चिकोडे ग्रंथालयातर्फे नवऊर्जा उत्सवात शुक्रवारी चित्रकार अस्मिता पोतदार यांचा सत्कार करताना सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार. शेजारी राहुल चिकोडे, सूरज गुरव, डॉ. देवानंद शिंदे, महापौर हसीना फरास. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)**

या सोहळ्यात महापौर हसीना फरास, सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, पोलिस उपअधीक्षक सूरज गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळविलेल्या महिला, युवतींचा सत्कार झाला.

आंतरराष्ट्रीय नेमबाज सुवर्णकन्या तेजस्विनी सावंत, चित्रकार डॉ. अस्मिता पोतदार, रिक्षा चालविणारी महिला रेखा दुधाणे, नौकानयन खेळाडू तारामती मत्तीवाडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. याशिवाय शहरातील महिला पत्रकारांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

(कै.) भालचंद्र चिकोडे ट्रस्ट व पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकाराने निर्माण चौकात उभारलेल्या नवऊर्जा दर्शन सोहळ्याला शालेय विद्यार्थी व महिला भाविकांनी भेट देत येथे नवदुर्गांचे दर्शन घेतले.

श्रद्धा, कलात्मकता, मांगल्य, प्रसन्नता अशा विविध छटांचा अपूर्व संगम साधून केलेल्या नवऊर्जा उत्सवाचा देखावा लक्षवेधी बनला आहे. नवऊर्जा देखाव्यात उभारलेल्या विविध देवदेवतांच्या प्रतिकृती पाहण्यासाठी रांगेने भाविक आत गेले. तेथे अंबाबाई, तुळजाभवानी, त्र्यंबोली, फिरंगाई, पद्मावती, कात्यायनी, अनुकामिनी आदी देवींच्या प्रतिमांचे दर्शन घेतले. सार्थक क्रिएशनच्या नृत्य कलावंतांनी नवदुर्गांचे माहात्म्य दाखविणारा 'आदिशक्ती' शक्ती हा बॅले नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे व सहकलावंतांनी सादर केला. यात उत्कृष्ट सांघिक नृत्याविष्कारातून सूर-ताल-लय यांचा सुरेख मेळ साधला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017

तरुण भारत

# नवऊर्जा उत्सवाचा आज समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवऊर्जा उत्सवाच्या नवव्या दिवशीही पावसात भाविकांनी गर्दी केली होती. विविध मान्यवरांनी उत्सवास भेट दिली. सायंकाळी महापौर फरास यांच्या हस्ते महिला पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु देवानंद शिंदे, तेजा देवकर प्रमुख उपस्थित होते. आज उत्सवाचा समारोप होणार आहे.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांच्या संकल्पनेतून व भालचंद्र चिकोडे ग्रंथालय ट्रस्टतर्फे निर्माण चौक येथे नवऊर्जा महोत्सवाचे आयोजन केले आहे. पहिल्या दिवसापासून हा महोत्सव गर्दी खेचत असून आतापर्यंत लाखो भाविकांनी उत्सवस्थळी भेट दिली आहे. शुक्रवारी टेंबलाई विद्यामंदिर, स्वयम मतीमंद शाळा, टाकाळा विद्यामंदिरसह आर. के. नगर येथील मातोश्री वृद्धश्रमातील जेष्ठांनी उत्सवस्थळी भेट देऊन नवदुर्गांचे दर्शन घेतले.

**महापौर हसिना फरास यांच्या हस्ते महिला पत्रकारांचा सत्कार**

30 SEP 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. राजेंद्र कोळेकर यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमध्ये ज्युनिअर विभागाकडे गेली २५ वर्षे या महाविद्यालयात कार्यरत असणारे नूतन पर्यवेक्षक आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कोल्हापूर विभागीय समन्वयक प्रा. राजेंद्र विश्वास कोळेकर यांना राज्य शासनाचा राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कार्य केल्याबद्दल उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून सन्मानित करण्यात आले.



**प्रा. राजेंद्र कोळेकर यांना राज्य उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित करताना गृह राज्यमंत्री रवींद्र रायकर. सोबत शिक्षणमंत्री विनोद तावडे, डॉ. देवानंद शिंदे व इतर**

मुंबई विद्यापीठात शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. अपर सचिव सीताराम कुंटे, मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू देवानंद शिंदे, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रमोद येवले, राज्यसंपर्क अधिकारी अतुल साळुंखे हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक गावे, अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, जोडले. अनेक श्रमसंस्कार शिबिरातून प्रबोधनाबरोबरच मनोरंजन व रचनात्मक विधायक कार्यक्रमातून अनेक लोकोपयोगी कामे केली. विविध उपक्रम राबविण्यात त्यांचे हे योगदान आहे. शिक्षण उपसंचालक मकरंद गोंधळी, सहसंचालक एन. डी. पारधी, प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, उपप्राचार्या डॉ. ऋतुजा बडसकर आदींचे त्यांना प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
'30 SEP 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात जैवविविधता कार्यशाळा

## बुधवारी आयोजन; वन विभागाचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र अधिविभाग व महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ आणि वन विभाग यांच्या वतीने बुधवारी (दि. ४ ऑक्टोबर) राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी साडेदहा वाजता राज्यस्तरीय 'जैवविविधता संर्वधन आणि जागरूकता' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बडेकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. या कार्यशाळेस राज्यात जैवविविधता संर्वधन, जागृती या अनुषंगाने विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन पान ७ वर

# शिवाजी विद्यापीठात जैवविविधता कार्यशाळा

**(पान १ वरून)** होणार आहे. यामध्ये प्रा. डॉ. पी. डी. राऊत, प्रा. डॉ. एस. पी. चव्हाण, डॉ. ए. डी. जाधव, विवेक डावरे, उपवन संरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ल, हेमंत ओगले, प्रा. डॉ. एस. आर. यादव आदी मार्गदर्शन करतील.

कार्यक्रम संयोजन सचिव डॉ. ए. डी. जाधव तर डॉ. एम. व्ही. शांताकुमार हे समन्वयक आहेत. या कार्यशाळेस राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व निवडक महाविद्यालयातील समन्वयक उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
लोकमत

# विद्यापीठात बुधवारी राज्यस्तरीय कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभाग, राज्य जैव विविधता मंडळ आणि वनविभागातर्फे बुधवारी (दि. ४ ऑक्टोबर) राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी साडेदहा वाजता या कार्यशाळेचे उद्घाटन राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बडेकर यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित असणार आहेत. कार्यशाळेचा विषय 'जैवविविधता संवर्धन आणि जागृती' असा आहे. त्यात विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा समारोप कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी पाच वाजता होईल, अशी माहिती पर्यावरण शास्त्राचे प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
पुढारी

# विद्यापीठामध्ये अवयवदान जागृती शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए अधिविभाग व छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने समाजामध्ये मरणोत्तर अवयवदान करण्याविषयी जनजागृती शिबिर बुधवारी (दि. ४) विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये शिबिर होणार आहे. अवयवदानाविषयी माहिती देण्यासाठी छत्रपती प्रमिलाराजे शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरामध्ये अवयवदान करू इच्छिणाऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. एच. एम. ठकार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 SEP 2017
लोकमत

# विद्यापीठात अवयवदान जागृती शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एमबीए अधिविभाग व छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर यांच्यातर्फे मरणोत्तर अवयवदान करण्याविषयी जागृती शिबिर दि. ४ ऑक्टोबरला विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये आयोजित केले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अवयवदान विषयावर भित्तीचित्र स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी पत्रकाद्वारे दिली.

30 SEP 2017 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातीत तंत्रज्ञान अधिविभागात आत्मसंरक्षणाचे धडे घेताना ज्यूदो खेळाडू.

# विद्यापीठात रणरागिणींना स्वरक्षणाचे धडे

**कोल्हापुर / प्रतिनिधी :**

नवरात्रीमध्ये मुलींना मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सशक्त बनविण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील तंत्रशिक्षण अधिविभागामध्ये न्यू ज्यूदो प्रशिक्षण केंद्रामधील मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. अधिविभागाच्या सभागृहामध्ये प्रशिक्षण पार पडले. सध्या जीवन असुरक्षित बनत आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षणासाठी घराबाहेर पडणाऱ्या मुलींना स्वतःचे रक्षण करता येणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून मुलींना संरक्षण करण्याचे प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. त्यासाठी न्यू ज्यूदो केंद्रातर्फे या प्रशिक्षणाचे अयोजन करण्यात आल्याची माहिती प्रशिक्षक शरद पोवार दिली. हल्ला झाल्यास त्याला निर्धाराने कसे सामोरे जाऊन प्रतिकार करण्याची माहितीही यावेळी त्यांनी दिली.

प्रतिकार कसा करावा, ज्यूदोचे प्रतिहल्ला तंत्र, कराटेचे पंचेस, किक, स्पायरिंग, बॉन लॉक, चोक, नेवाजा, विविध थ्रो, स्वरक्षणाची शास्त्रशुद्ध पद्धतीचे प्रात्यक्षिक रुध्वी शृंगारपुरे, सिद्धी शिरवडेकर, सूर्यागिनी इंगळे, गौरी पाटील, शीतल रसाळ यांनी दाखवले; तर प्रा. पूनश्री फडणीस, प्रा. लक्ष्मी निकम, प्रा. अमृता मांजरेकर यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. अधिविभागचे डॉ. जयदीप बागी यांची उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
पुण्यनगरी

# प्राध्यापकांची कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ आयोजित 'फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचा प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम कसा शिकवावा' याविषयी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे म्हणाले, प्राध्यापकांसाठी कार्यशाळा घेणे ही बाब कौतुकास्पद आहे. या कार्यशाळेतून औद्योगिक कौशल्य आणि विषयाचे सखोल ज्ञान असणारे विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांना मदत होणार आहे. या कार्यशाळेत १८ फार्मसी महाविद्यालयांतील ऐंशीहून अधिक प्राध्यापक सहभागी झाले होते. सूत्रसंचालन तानिया मेहतर यांनी केले, तर आभार प्रा. डी. पी. माळी यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
तरुण भारत

# आधुनिक संशोधन काळाची गरज : डॉ. पी. एस. कांबळे

**कोलोली :** समाजातील सर्व प्रश्न सोडवण्यासाठी आधुनिक संशोधन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. माळवाडी/कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले महाविद्यालयात संशोधन पध्दती, स्वरूप व आराखडा या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक व जि. प. चे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती डॉ. के. एस. चौगुले होते. संशोधन म्हणजे ज्ञानाची पातळी वाढविण्यासाठी एखाद्या विषयाचा प्रायोगिक पध्दतीने नियोजनबध्द अभ्यास करणे होय, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. प्रास्ताविक प्रा. पी. डी. माने यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पी. व्ही. सदाशिव यांनी केले. आभार प्रा. सौ. एम. एच. पाटील यांनी मानले. शिक्षण संस्थेचे सचिव शिवाजी पाटील–यवलूजकर, प्राचार्य डॉ. जे. के. पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
पुढारी

# विद्यार्थ्यांमध्ये आंतरसांस्कृतिक संवादाची गरज : डॉ. अमृत यार्दी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये आंतरसांस्कृतिक संवादाची अत्यंत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन कर्नाटक कॉलेज येथील मराठी विभागाचे डॉ. अमृत यार्दी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागात शिक्षक दिन आणि लेखक आपल्या भेटीस असा संयुक्त उपक्रम घेण्यात आला. त्यावेळी डॉ. यार्दी बोलत होते. अध्यक्षस्थानी इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. सी. ए. लंगरे होते.

डॉ. यार्दी म्हणाले, शेजारील राज्यांमधील भाषेवर प्रेम करा. संयम आणि सहिष्णूता या गुणांची आजच्या सामाजिक सदृढतेसाठी फार मोठी आवश्यकता आहे. संस्कृतीची, मूल्यांची जपणूक करणे ही सगळ्यांचीच जबाबदारी आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील ज्ञानाच्या आदान-प्रदानामुळे सुसंस्कृत पिढी घडण्यास मदत होते. आधुनिक काळातील शिक्षकांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाबद्दल डॉ.ब यार्दी यांनी सविस्तर चर्चा केली. या समारंभास अधिविभागातील सर्व शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
पुढारी

# विद्यापीठाचे कामकाज उद्या सुरू

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेसाठी रविवारी (दि.१) सकाळी १०.२० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लेखी अपिल, आवश्यक कागदपत्रे, दस्तऐवज स्वीकारण्यासाठी आवक-जावक विभाग (खोली क्र.१३८) सुरू राहील. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
लोकमत

# आवक-जावक विभाग उद्या सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयाला रविवारी (दि. १) सुटी आहे. तरी विविध अधिकार मंडळांच्या निवडणूक अनुषंगाने लेखी अपील, कागदपत्रे, दस्तावेज स्वीकारण्यासाठी आवक-जावक विभाग सुरू राहणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 SEP 2017
तरुण भारत

# विद्यापीठाचा आवक-जावक विभाग उद्या सुरू राहणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यालयाला १ ऑक्टोबर रोजी सुटी आहे. मात्र, लेखी अपील, आवश्यक कागदपत्रे, दस्तऐवज स्वीकारण्यासाठी आवक-जावक विभाग (खोली क्रमांक १३८) सकाळी सव्वा दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरू राहणार आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी कळवले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
तरुण भारत

# संगणकशास्त्र विद्यार्थिनींची प्लेसमेंट ड्राईव्हमधून निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागातील प्रियांका महावीर पाटील (एम.सी.ए.) व ऐश्वर्या अजित राऊत (एम.एस्सी.) या दोन विद्यार्थीनींची प्लेसमेंट ड्राईव्हमधून निवड करण्यात आली. या विद्यार्थीनींना पुण्यातील रिअल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी कंपनी वार्षिक अडीच लाखांचे पॅकिज देणार आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये संगणशास्त्र अधिविभागातील शंभर तर अन्य महाविद्यालयातील सुमारे पन्नास विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागामधील विद्यार्थ्यांना पुण्यातील रिअल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी कंपनीमध्ये नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली. निवड प्रक्रीयेची माहिती विद्यार्थ्यांना दिल्यानंतर त्यांची सामान्य कल चाचणी घेण्यात आली. त्यानंतर लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली. यातून या दोन विद्यार्थीनीची निवड करण्यात आली. प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन अधिविभागप्रमुख डॉ.आर.के.कामत यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट अधिकारी डॉ.यु.आर.पोळ यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
पुण्यनगरी

# संगणकशास्त्र अधिविभागामध्ये प्लेसमेंट ड्राईव्ह

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागामध्ये पुण्याच्या रिअल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी यांनी प्लेसमेंट ड्राईव्हसाठी प्राधान्यक्रमाने विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांची सामान्य कल चाचणी घेण्यात आली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली. संगणकशास्त्र अधिविभागातील प्रियांका महावीर पाटील आणि ऐश्वर्या अजित राऊत या दोन विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये संगणशास्त्र अधिविभागाचे शंभर विद्यार्थी तसेच अन्य महाविद्यालयांतील सुमारे पन्नास विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2017
Times of India

# University to hold organ donation drive on October 4

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The city-based Chhatrapati Pramila Raje (CPR) civil hospital, in association with Shivaji University, Kolhapur (SUK), has organised an organ donation awareness drive on the university campus on October 4.

According to the SUK officials, CPR dean Jayprakash Ramanand will be attending the event along with the university's pro-vice-chancellor, D T Shirke.

A poster competition will also be organised at the venue on the said date, said the varsity officials.

The officials have appealed to citizens and students to attend the event and register for organ donation.

Health department officials said that over 5,600 citizens have registered themselves for organ donation till date.

**Placement campaign**

A placement drive was conducted at the Shivaji University, Kolhapur (SUK) earlier this week. The department of computer science of the university and Real Software Technology organised the event. An aptitude test was conducted and the selected students were asked to appear for the interview round.

The officials said that around 100 students from the university's department and 50 from affiliated colleges participated in the drive. A few students got offer letters at the end of the day.